ePaper
अमेरिकेचा इराणमधील बालकांच्या कॅन्सर रुग्णालयाजवळ हवाई हल्ला

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 17 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 3 वरुन...

मोशी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना १० लाखांची मदत

## देशाची गगनयान मोहीम रखडणार? केंद्र सरकारचा हस्तक्षेप

# इस्रोमध्ये १०० हून अधिक शास्त्रज्ञांचे राजीनामे?

महाईन्यूज । कोलकाता

**भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) तील शास्त्रज्ञांच्या वाढत्या राजीनाम्यांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. गगनयानसारख्या महत्त्वाच्या आणि संवेदनशील अंतराळ मोहिमांमध्ये कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी स्वेच्छानिवृत्ती आणि राजीनाम्यांच्या प्रक्रियेत बदल करण्यात आले आहेत. आता गगनयान व इतर महत्त्वाच्या प्रकल्पांवर कार्यरत असलेल्या 'ग्रुप ए'मधील वैज्ञानिक आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांचे राजीनामे किंवा स्वेच्छानिवृत्तीचे अर्ज संबंधित केंद्रांकडून थेट स्वीकारले जाणार नाहीत. अंतिम निर्णयासाठी हे अर्ज अंतराळ विभागाकडे पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**

१४ जुलै रोजी जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार हा निर्णय सर्व इस्रो केंद्रांना लागू करण्यात आला आहे. महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये अचानक मनुष्यबळाची कमतरता निर्माण होऊ नये आणि सुरू असलेल्या मोहिमांचे काम प्रभावित होऊ नये, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

माध्यमांतील वृत्तानुसार, गेल्या काही महिन्यांत इस्रोमधील सुमारे १०० ते १२० शास्त्रज्ञांनी राजीनामे दिले आहेत. यामध्ये बंगळुरू येथील यू. आर. राव सॅटेलाइट सेंटरमधून सुमारे ८०, तर तिरुवनंतपुरम येथील विक्रम साराभाई स्पेस सेंटरमधून सुमारे २० शास्त्रज्ञांनी नोकरी सोडल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या आकडेवारीला अंतराळ विभागाकडून अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही.

या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायण यांनी परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगितले. कोणत्याही संस्थेमध्ये कर्मचारी नोकरी सोडत असतात, ही सामान्य बाब असून त्यामुळे इस्रोच्या महत्त्वाच्या प्रकल्पांवर परिणाम होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. एखादा शास्त्रज्ञ नोकरी सोडल्यास त्याच्या जागी दुसऱ्या अधिकाऱ्याची नियुक्ती करून कामकाज सुरळीत सुरू ठेवले जाईल. तसेच नव्या परिपत्रकाचा उद्देश केवळ कर्मचाऱ्यांना रोखणे नसून, देशासाठी महत्त्वाच्या अंतराळ मोहिमांचे काम वेळेत आणि नियोजनानुसार पूर्ण होणे हा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम असलेल्या गगनयान प्रकल्पाकडे देशासह जगाचे लक्ष लागले आहे. अशा परिस्थितीत अनुभवी शास्त्रज्ञांच्या मोठ्या प्रमाणावरील निर्गमनामुळे प्रकल्पांच्या वेळापत्रकावर परिणाम होऊ नये, यासाठी केंद्र सरकारने ही खबरदारीची भूमिका घेतल्याचे मानले जात आहे.

### सामूहिक राजीनाम्यांमागील कारणे आणि आकडेवारी

माध्यमांतील वृत्तानुसार, सुमारे १०० शास्त्रज्ञांनी राजीनामे सादर केल्यामुळे केंद्र सरकारला हे पाऊल उचलावं लागलं आहे. अंतराळ विभागाने अधिकृतपणे ही संख्या जाहीर केलेली नसली, तरी 'द टाइम्स ऑफ इंडिया'ने इस्रोमधील विविध सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे की, गेल्या काही महिन्यांत १०० ते १२० शास्त्रज्ञांनी राजीनामे दिले असण्याची शक्यता आहे. यामध्ये बंगळुरू (कर्नाटक) येथील 'यू. आर. राव सॅटेलाइट सेंटरमधून तब्बल ८० शास्त्रज्ञांनी, तर तिरुवनंतपुरम येथील विक्रम साराभाई स्पेस सेंटरमधून सुमारे २० शास्त्रज्ञांनी नोकरी सोडली आहे.

### केंद्र सरकारचे थेट आदेश

१४ जुलै जारी करण्यात आलेले पत्रक इंडिया टुडेच्या हाती लागले आहे. त्यानुसार, केंद्र सरकारने इस्त्रोच्या सर्व केंद्रांना महत्वाचे आदेश दिले आहेत. गगनयान आणि इतर महत्त्वाच्या मोहिमांशी संबंधित असलेल्या 'ग्रुप ए' मधील वैज्ञानिक आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांचे राजीनामे किंवा स्वेच्छानिवृत्तीचे अर्ज स्वीकारू नयेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. या परिपत्रकानुसार, आता राजीनामा किंवा निवृत्तीशी संबंधित सर्व अर्ज पुढील निर्णयासाठी थेट अंतराळ विभागाकडे पाठवले जातील.



# कात्रज-कोंढवा रस्त्याचं काम पुन्हा लांबणीवर

## सात वर्षांपासून पुणेकर वाहतूककोंडीत; २०२७पर्यंत प्रतीक्षा

**महाईन्यूज । पुणे**

**कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी पुणे महापालिकेने दिलेली जूनअखेरची मुदत पुन्हा हुकली असून, आता हा प्रकल्प मार्च २०२७पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने जाहीर केले आहे. सात वर्षांपासून रखडलेल्या या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी, धूळ आणि खड्ड्यांचा सामना करणाऱ्या नागरिकांची प्रतीक्षा आणखी वाढली आहे.**



महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी दोन दिवसांपूर्वी या रस्त्यासाठीची आढावा बैठक घेतली होती. त्यामध्ये कात्रज ते खडी मशिन चौकादरम्यानचा रस्ता मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या रस्त्यासाठीच्या भूसंपादनाचा तिढा तोपर्यंत सुटेल, असे अपेक्षित असून, त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. या रस्त्याचे काम यापूर्वी जूनअखेर काम पूर्ण होईल, असे प्रशासनाने म्हटले होते. मात्र, काम वेळेत पूर्ण होऊ शकले नाही.

कात्रज ते खडी मशिन चौक या सुमारे साडेतीन किलोमीटरच्या रस्त्याच्या रुंदीकरणाचा प्रकल्प सन २०१७मध्ये सुरू झाला. सुरुवातीला ८४ मीटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित होता. मात्र, भूसंपादनातील अडचणी, नियोजनातील बदल आणि प्रशासकीय प्रक्रियांमुळे प्रकल्प रखडला. अखेर पहिल्या टप्प्यात ५० मीटर रुंदीकरण करण्याचा निर्णय घ्यावा लागला. या कामासाठी आवश्यक असलेल्या १०९ मिळकतींपैकी ८४ मिळकती ताब्यात आल्या असून, उर्वरित २५ मिळकतींचे भूसंपादन अद्याप सुरू आहे. पुढील आठवड्यात ही प्रक्रिया पूर्ण होईल, असा दावा प्रशासनाने केला आहे.

कात्रज-कोंढवा रस्त्यावर दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. अपूर्ण रस्ता, अरुंद मार्ग, खड्डे आणि धुळीमुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सुरुवातीला 'टीडीआर' आणि 'एफएसआय'च्या माध्यमातून भूसंपादन करण्याचे नियोजन होते. मात्र, अनेक जागामालकांनी रोख मोबदल्याची मागणी केल्याने महापालिकेला धोरणात बदल करावा लागला. जिल्हाधिकारी आणि राज्य सरकारची मंजुरी मिळाल्यानंतर एप्रिलपासून रोख मोबदल्याद्वारे भूसंपादनाला गती देण्यात आली आहे. या प्रक्रियेत सुमारे ४४ हजार चौरस मीटर जागा महापालिकेच्या ताब्यात येणार आहे. भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर उर्वरित रस्ता रुंदीकरणाचे काम वेगाने पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

### कात्रज-कोंढवा रस्त्याचं काम

लांबी- सुमारे ३.५ कि.मी. (कात्रज ते खडीमशिन चौक)
प्रकल्पाची सुरुवात- २०१७
मूळ प्रस्तावित रुंदी- ८४ मीटर
सध्या मंजूर रुंदी- ५० मीटर
एकूण मिळकती- १०९
ताब्यात आलेल्या मिळकती- ८४
प्रलंबित मिळकती- २५
नवीन डेडलाइन- मार्च २०२७

# सिया गोयलच्या कुटुंबीयांच्या दुकानावर एफडीएची कारवाई!

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्याच्या लोहगड येथील केतन अग्रवाल हत्या प्रकरणातील आरोपी सिया गोयल हिच्या वडिलांच्या दुकानावर एफडीएने मोठी कारवाई केली आहे. सिया गोयल ही सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. केतन अग्रवाल हत्या प्रकरणामुळे ती चर्चेत आली. तिचं पुण्यातील बांधकाम व्यावसायिक केतन अग्रवाल याच्याशी लग्न ठरलं होतं. दोघांचा साखरपुडा देखील झाला होता. पण सियाचं चेतन चौधरी या तरुणासोबत प्रेम प्रकरण होतं. सिया आणि चेतन या दोघांनी केतनला लोहगड किल्ल्यावरुन ढकलून देत त्याची हत्या केल्याचा आरोप आहे. या प्रकरणातील आरोपी सिया गोयल हिच्या वडिलांना आता मोठा धक्का देणारी बातमी समोर आली आहे.**





अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडून राज्यभरात मोहीम राबवली जात आहे. या मोहीमच्या माध्यमातून दुषित अन्नपदार्थ आणि खाद्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. तुकाराम मुंढे यांच्या खात्याच्या अधिकाऱ्यांनी पुण्यात सिया गोयल हिच्या वडिलांच्या दुकानावर छापा टाकला. यावेळी आठ लाखांचा माल जप्त करण्यात आला आहे.

सिया गोयलच्या वडिलांचं पुण्यातील मार्केट यार्ड परिसरात मसाल्याचं दुकान आहे. अन्न आणि औषध प्रशासनाने या दुकानात धाड टाकली. यावेळी तपासणी केल्यानंतर हळद पावडर, तीळ, सोयाबीनचे नमुने जप्त करण्यात आले आहेत. 8 लाख रुपयांचा 4 हजार किलोंचा साठा जप्त करण्यात आला आहे. लेबलमधील त्रुटी, भेसळीच्या संशयावरुन हा साठा जप्त करण्यात आला आहे. संबंधित दुकानाने आवश्यक नियम आणि तरतुदींचे पालन न केल्याने पुढील आदेशापर्यंत थेट व्यवसाय बंद करण्याची नोटीस देण्यात आली आहे.

सिया गोयलच्या वडिलांचे पुण्यातील मार्केट यार्ड परिसरात बी. जी. गोयल ॲण्ड कंपनी नावाचे दुकान आहे. या दुकानावर एफडीएने मंगळवारी अचानक धाड टाकली आणि तपासणी केली. यावेळी दुकानातील माल निकृष्ट दर्जाचा असल्याचा ठपका ठेवण्यात आला आणि चार हजार किलोंचा साठा असा एकूण 8 लाखांचा माल जप्त करण्यात आला आहे. एफडीएने सिया गोयलच्या वकिलांचे दुकानाच सील केलं आहे.

### एफडीएने काय म्हटलं आहे?

व्यवसायाचा परवाना नसून दुकानाचा माल निकृष्ठ दर्जाचा आहे. संबंधित आस्थापन हे वैध परवान्याशिवाय व्यवसाय करत असल्याचे आणि अन्न सुरक्षा मानांकनाचे उल्लंघन करत असल्याचे एफडीएच्या लक्षात आलं आहे. विशेष म्हणजे एका ठिकाणी व्यवसाय करण्याचा परवाना असताना दुसऱ्या ठिकाणी व्यवसाय सुरु होता, असा ठपका या दुकानावर आहे. एफडीएने एकूण चार प्रकारचे नमुने घेतले होते. त्यामध्ये दोन वेगवेगळ्या प्रकारचे हळद, एका ब्रँडचे तीळ आणि एका ब्रँडचे सोयाबीनचे नमुने घेण्यात आले. अधिकाऱ्यांनी 4 हजार 172 किलोंचा साठा जप्त केला आहे. त्याची एकूण किंमत 8 लाख 14 हजार 630 अशी आहे. या तपासणीत त्रुटी आढळल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. अन्न पदार्थ कमी दर्जाचे आणि आरोग्यासाठी असुरक्षित असल्याचा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

# मोशी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना १० लाखांची मदत सुरू

## अक्षय सावंत यांच्या वारसांच्या खात्यात १० लाख जमा; इतरांच्या मदतीची प्रक्रिया वेगात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथील दुर्दैवी दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने शहराच्या कचरा व्यवस्थापनासाठी पर्यायी उपाययोजनांना गती दिली आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार शहरातील तब्बल ११ संभाव्य ठिकाणांचा सर्व्हे करण्यात आला असून, पर्यायी कचरा डेपो उभारणीसाठी प्रशासनाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत.**



मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी महापालिकेने सुरू केली आहे. त्यानुसार मृत अक्षय सावंत (वय ३२) यांच्या कुटुंबीयांच्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर त्यांच्या वारसांच्या खात्यात १० लाख रुपयांची आर्थिक मदत जमा करण्यात आली असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली. या आर्थिक मदतीपैकी अक्षय सावंत यांच्या पत्नी हर्षदा सावंत यांच्या खात्यात ३४ टक्के, तर आई रेश्मा सावंत आणि वडील राजू सावंत यांच्या खात्यात प्रत्येकी ३३ टक्के रक्कम जमा करण्यात आली आहे.

दरम्यान, दुर्घटनेत मृत्यू झालेल्या भावेश वाणी (३३), सुनील कोरके (४०, आळंदी), सन्नी माने (३९, गंधर्वनगरी, मोशी), महेश कुंभार (३३, छत्रपती संभाजीनगर), नागेश गायकवाड (२६, संजय गांधी नगर, मोशी), रणजीत पाटील (२२, मोशी), राहुल गायकवाड (२३, मोशी) तसेच वामन कसबे (५०, मोशी) यांच्या कुटुंबीयांच्या कागदपत्रांची पूर्तता जलद गतीने सुरू असून, प्रक्रिया पूर्ण होताच त्यांच्या वारसांच्या खात्यातही याच पद्धतीने आर्थिक मदतीची रक्कम जमा करण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

> मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी जलद गतीने सुरू असून, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होताच ही मदत त्यांच्या खात्यात जमा केली जात आहे. बाधित कुटुंबांना या कठीण प्रसंगी सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे. याचबरोबर शहरातील सर्व वेस्ट मॅनेजमेंट प्रकल्पांतील सुरक्षा व्यवस्थेचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक त्या सुधारणा तातडीने राबविण्यात येत आहेत.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की, मोशी दुर्घटनेतील बाधित कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याचा निर्णय प्रभावीपणे राबविण्यात येत असून, आवश्यक कागदपत्रे पूर्ण होताच मदतीची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केली जात आहे. तसेच, शहरातील सर्व वेस्ट मॅनेजमेंट प्रकल्पांतील सुरक्षा व्यवस्थेचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक त्या सुधारणा तातडीने राबविण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

### बाधितांना दिलासा देण्याची प्रक्रिया वेगात

मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्यू झालेल्या प्रत्येक नागरिकाच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. अक्षय सावंत यांच्या वारसांच्या खात्यात मदतीची रक्कम जमा करण्यात आली असून, उर्वरित मृतांच्या कुटुंबीयांची कागदपत्रे पूर्ण होताच त्यांनाही आर्थिक मदत वितरित केली जाणार आहे.

# 'मृत्यूला जात नसते'; कामगारांच्या मृत्यूचे राजकारण थांबवा : डॉ. बाबा कांबळे




**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथील महानगरपालिकेच्या कचरा डेपोमधील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पात ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेनंतर काही जण या घटनेला जातीय आणि धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न करत असून, कामगारांच्या मृत्यूचे राजकारण करणे अत्यंत दुर्दैवी असल्याची टीका कष्टकरी कामगार पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे यांनी केली. कामगारांना न्याय मिळवून देणे हेच आमचे उद्दिष्ट असून, मृतांच्या जाती-धर्माचा शोध घेणे हे संविधानविरोधी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**

### कामगारांच्या न्यायासाठी चार प्रमुख मागण्या

मोशी दुर्घटनेप्रकरणी संबंधित कंपनीवर कठोर फौजदारी कारवाई करून ब्लॅकलिस्ट करावे, कंत्राटी पद्धत बंद करून कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, मृतांच्या कुटुंबीयांना जाहीर केलेली ४० लाख रुपयांची आर्थिक मदत आणि एका सदस्याला नोकरी तातडीने द्यावी, तसेच शहरातील सर्व कचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे थर्ड पार्टी सेफ्टी ऑडिट करून सुरक्षा उपाययोजना बंधनकारक कराव्यात, अशी मागणी कष्टकरी कामगार पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे यांनी केली.

डॉ. कांबळे म्हणाले, "कामगार हा केवळ कामगार असतो. त्याच्या मृत्यूनंतर जात आणि धर्माचा मुद्दा उपस्थित करणे हे मानवतेलाच काळिमा फासणारे आहे. काही राजकीय स्वार्थातून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असून, अशा प्रवृत्तींचा आम्ही तीव्र निषेध करतो."

दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ दखल घेत उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी समितीची स्थापना, संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन, प्रकल्प प्रमुखाविरुद्ध कारवाई आणि दोषींवर कठोर कारवाईचे निर्देश दिल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच भारतीय जनता पक्ष आणि स्थानिक नेतृत्व पीडित कुटुंबांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचेही त्यांनी सांगितले.

आमदार महेश लांडगे यांनी दुर्घटनेनंतर घटनास्थळी भेट देऊन कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गांभीर्याने मांडला असून, पीडितांना न्याय मिळावा यासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचे डॉ. कांबळे यांनी सांगितले.

दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून ५ लाख, महापालिकेकडून १० लाख आणि संबंधित कंपनीकडून २५ लाख रुपये, अशी एकूण ४० लाख रुपयांची आर्थिक मदत तसेच कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्याचा निर्णय स्वागतार्ह असल्याचे त्यांनी म्हटले.

> "मोशी दुर्घटनेतील प्रत्येक कामगाराला न्याय मिळालाच पाहिजे. या घटनेचे जातीय किंवा धार्मिक राजकारण करण्याऐवजी दोषींवर कठोर कारवाई, कामगारांची सुरक्षितता आणि पीडित कुटुंबांचे पुनर्वसन याला प्राधान्य दिले पाहिजे. कामगारांच्या हक्कांसाठी कष्टकरी कामगार पंचायत शेवटपर्यंत लढत राहील."
>
> **- डॉ. बाबा कांबळे, अध्यक्ष, कष्टकरी कामगार पंचायत**

यावेळी कष्टकरी कामगार पंचायतीने संबंधित कंपनीवर कठोर फौजदारी कारवाई, कंत्राटी पद्धत बंद करून कामगारांना कायमस्वरूपी सेवा, सर्व कचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे थर्ड पार्टी सेफ्टी ऑडिट आणि पीडित कुटुंबांना जाहीर केलेली मदत तातडीने देण्याची मागणी केली.

डॉ. कांबळे यांनी नागरिकांना आवाहन करताना, या दुर्घटनेला जातीय किंवा धार्मिक रंग देण्याच्या प्रयत्नांना बळी न पडता सामाजिक सलोखा आणि संविधानिक मूल्यांचे जतन करण्याचे आवाहन केले.



## भूमिका

**लोकशाही व्यवस्थेत जनआंदोलने ही जनतेच्या भावना आणि अपेक्षा व्यक्त करणारी प्रभावी माध्यमे असतात. सत्ताधाऱ्यांनी आंदोलकांच्या प्रत्येक मागणीला मान्यता द्यावीच असे नसले, तरी त्यांच्या आवाजाची दखल घेणे आणि संवादाचा मार्ग खुला ठेवणे हे लोकशाहीचे मूलभूत कर्तव्य आहे.**

# संवादाचा अभाव, लोकशाहीसाठी धोक्याची घंटा



सध्या 'नीट' परीक्षेतील कथित गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरणवादी सोनम वांगचुक सहभागी झाले असून, त्यांच्या दीर्घ उपोषणामुळे प्रकृती चिंताजनक बनली आहे. ही बाब केवळ एका आंदोलनापुरती मर्यादित नसून लोकशाहीतील संवाद संस्कृतीसमोर उभे राहिलेले गंभीर आव्हान आहे.सोनम वांगचुक हे शिक्षण, विज्ञान आणि पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यामुळे देशभर परिचित आहेत.

लडाखमधील शिक्षणव्यवस्थेत बदल घडवून आणणारी 'एसईसीएमओएल' संस्था आणि पाण्याच्या समस्येवर उपाय म्हणून विकसित केलेले 'आइस स्तूप' तंत्रज्ञान यामुळे त्यांना जागतिक स्तरावर ओळख मिळाली.

त्यांच्या प्रेरणादायी कार्यावर आधारित 'थ्री इडियट्स' चित्रपटातील 'फुंसुक वांगडू' ही व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनात घर करून राहिली. अशा व्यक्तीला विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागणे ही चिंतेची बाब आहे. देशात यापूर्वीही अनेक जनआंदोलनांकडे सरकारने उदासीनतेने पाहिल्याची टीका झाली आहे.

शेतकरी आंदोलन, महिला कुस्तीपटूंचे आंदोलन किंवा लडाखच्या प्रश्नावर वांगचुक यांनी केलेले आंदोलन यामध्ये संवादाऐवजी विलंब आणि दुर्लक्ष अधिक दिसून आले. लोकशाहीत मतभेद स्वाभाविक असले, तरी संवाद टाळणे आणि आंदोलकांना संशयाच्या नजरेने पाहणे ही प्रवृत्ती लोकशाही संस्थांवरील विश्वास कमी करणारी ठरू शकते. 'नीट' परीक्षेतील कथित गोंधळ आणि पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

त्यामुळे या प्रकरणातील जबाबदारी निश्चित करणे, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. मात्र, केवळ एका मंत्र्याचा राजीनामा हा सर्व समस्यांवरील अंतिम उपाय ठरू शकत नाही. परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, संस्थात्मक कमकुवतपणा आणि भ्रष्टाचाराच्या शक्यतांवर दीर्घकालीन सुधारणा करणे अधिक महत्त्वाचे आहे.

सोनम वांगचुक यांच्यासारख्या दूरदृष्टी असलेल्या व्यक्तींनी राष्ट्रहितासाठी आपली ऊर्जा शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक परिवर्तनासाठी वापरणे देशासाठी अधिक उपयुक्त ठरेल. त्याचवेळी सरकारनेही आंदोलनांकडे विरोधकांचा कार्यक्रम म्हणून न पाहता लोकशाहीतील अभिप्राय म्हणून पाहण्याची गरज आहे. संवाद, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या तत्त्वांवरच लोकशाही अधिक सक्षम बनते. आंदोलकांचे प्राण धोक्यात आल्यानंतर नव्हे, तर त्यापूर्वीच चर्चेचे दरवाजे उघडणे हीच खरी लोकशाहीची ओळख आहे.

## प्रासंगिक »

### दुस-याबाबतचा दृष्टीकोन

**एका इंग्रज पत्रकाराने श्रीकृष्ण मेनन यांची मुलाखत घेताना त्यांच्या गरिबी, संघर्ष आणि वैयक्तिक आयुष्याचा उल्लेख करून त्यांना अस्वस्थ करण्याचा प्रयत्न केला.**

त्यानंतर त्यांनी मेनन यांना, "तुम्ही कम्युनिस्ट आहात का?" असा थेट प्रश्न विचारला. मेनन यांनी शांतपणे उत्तर देत पत्रकाराच्या संघर्षाचे कौतुक केले. मग त्यांनीही पत्रकाराला त्याच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित अतिशय खासगी प्रश्न विचारला.

हा प्रश्न ऐकताच पत्रकार निरुत्तर झाला आणि त्याने लगेच विषय बदलला. या प्रसंगातून मेनन यांनी कोणालाही दुखावल्याशिवाय, दुसऱ्याच्या खाजगी आयुष्यात विनाकारण हस्तक्षेप करणे किती अयोग्य आहे, हे प्रभावीपणे दाखवून दिले.

- तात्पर्य : प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात काही गोष्टी अतिशय वैयक्तिक असतात. दुसऱ्याच्या भावना दुखावतील किंवा त्याला अपमानास्पद वाटतील असे प्रश्न विचारणे टाळावे. समोरच्याच्या गोपनीयतेचा आदर करणे, संवेदनशीलता जपणे आणि सभ्यतेने वागणे हेच खरे सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे.

आषाढ महिन्याच्या आगमनाने निसर्गात नवचैतन्य निर्माण होते. काळेभोर मेघ, रिमझिम पाऊस आणि हिरवाईने नटलेली धरती मनाला नवसंजीवनी देतात. याच आषाढाच्या पहिल्या दिवशी कविकुलगुरू कालिदासांच्या मेघदूतची आठवण जागी होते.

# मेघदूत ते पंढरी : आषाढातील अनुभूतीचा प्रवास



आषाढातील पहिला मेघ हा केवळ पावसाचा दूत नसून विरह, आशा आणि भेटीच्या उत्कट ओढीचे प्रतीक आहे. याच काळात महाराष्ट्रात लाखो वारकरी विठ्ठलनामाचा गजर करत पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करतात. त्यामुळे आषाढाचा मेघ आणि आषाढी वारी हे भारतीय संस्कृतीतील भावविश्वाचे दोन समांतर प्रवाह असल्याचे जाणवते.

मेघदूतमध्ये विरही यक्ष आपल्या प्रिय व्यक्तीपर्यंत संदेश पोहोचवण्यासाठी मेघाला दूत बनवतो. दुसरीकडे वारकरी विठ्ठलभक्तीचा संदेश घेऊन पायी पंढरीची वाट धरतात. दोघांच्याही प्रवासामागे भेटीची आस, श्रद्धा आणि भावनेची प्रचिती आहे. एकाचा प्रवास आकाशमार्गे तर दुसऱ्याचा भूमीमार्गे असला, तरी दोघांचे ध्येय भावनांचेच वहन करणे हेच आहे.

म्हणूनच कालिदासांचे काव्य आणि महाराष्ट्राची वारी यांच्यात एक अदृश्य सांस्कृतिक नाते निर्माण झाले आहे. मेघदूत हे केवळ विरहकाव्य नाही. त्यामध्ये भारतीय निसर्ग, भूगोल, संस्कृती आणि मानवी भावविश्वाचे अत्यंत सूक्ष्म चित्रण आढळते. 'आषाढस्य प्रथम दिवसे' या ओळींनी सुरू होणारे हे काव्य आजही प्रत्येक संवेदनशील मनाला स्पर्श करते. आषाढातील पहिला मेघ पाहताना विरही यक्षाची आठवण येते, तर पावसाच्या सरींतून चालणाऱ्या वारकऱ्यांमध्ये भक्तीची अखंड परंपरा अनुभवास येते. आषाढी वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून समता, बंधुभाव आणि सामूहिक संस्कारांची शाळा आहे. जात, धर्म, भाषा आणि सामाजिक भेद विसरून लाखो वारकरी एकाच ध्येयाने पंढरीकडे वाटचाल करतात.

टाळ-मृदंगाचा निनाद, अभंगांचा गजर आणि विठ्ठलनामाची अखंड धून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करते. ही परंपरा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा अविभाज्य भाग बनली आहे. आजच्या वेगवान आणि तणावग्रस्त जीवनात मेघदूत आपल्याला भावनांचे महत्त्व शिकवते, तर वारी श्रद्धा, संयम आणि सामूहिकतेचे मूल्य जपण्याची प्रेरणा देते. आषाढाचा पहिला मेघ आणि पंढरीकडे निघालेली दिंडी हे दोन्ही आशा, प्रेम आणि अध्यात्माचे संदेशवाहक आहेत. म्हणूनच आषाढ हा केवळ ऋतू नसून भारतीय संस्कृतीतील अनुभूती, भक्ती आणि संवेदनशीलतेचा अखंड उत्सव आहे.

## ।। अभंगवाणी ।।



जेविले ते संत मागें उष्टावळी ।
अवघ्या पत्रावळी करुनी झाडा ॥१॥

सोवळ्या ओंवळ्या राहिलों निराळा ।
पासूनि सकळां अवघ्यां दुरीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पंढरपुरात व्हीआयपी दर्शनाचा फज्जा

## मंत्री गुलाबराव पाटलांच्या समर्थकांना सोडले तर मुनगंटीवार ताटकळले

महाईन्यूज । पंढरपुर

**आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आणि दर्शन रांगेतील भाविकांना सुलभ दर्शन व्हावे या उद्देशाने सोलापूरचे जिल्हाधिकारी यांनी व्हीआयपी दर्शन बंद करण्याचे आदेश काढले. या आदेशाचे उल्लंघन करणार्यावर फौजदारी गुन्हे दाखल करणार असे जाहीर केले. मात्र भाजपाचे जेष्ठ नेते माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना दर्शनासाठी तात्कळत ठेवले. तर दुसरीकडे मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अनेक समर्थकांनी धक्का बुक्की करत मंदिरात प्रवेश केला. व्हीआयपी दर्शन बंद आहे. याचे भान मंत्र्यांना राहिले नाही. मात्र आम्ही अडीचशे किलोमीटर दूरवरून आलोय . सोबतच्या लोकांनी दर्शन घेतल्याची कबुली मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. मात्र या घटनेवरून व्हीआयपी दर्शन बंदीच्या आदेशाचा फज्जा उडाला.**



आषाढी वारीला लाखो भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी येतात. दर्शन रांगेत तासान तास उभे राहतात. असे असताना दुसरीकडे व्हीआयपी म्हणजे राजकारणी,अधिकारी,सामाजिक कार्यकर्ते व अन्य मंडळी दर्शन रांग सोडून झटपट दर्शन करतात. त्यामुळे रांगेतील भाविकांच्या दर्शनाला वेळ लागतो.

या साऱ्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी १५ जुलै पासून विठ्ठलाचे व्हिआयपी दर्शन बंद ठेवण्याचे आदेश श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला दिले. त्यावर देखरेख आणि अंमलबजावणी करण्यासाठी दोन महसूलचे अधिकारी नियुक्त केले. मात्र काही तासात एका सामजिक संघटनेचे पदाधिकारी यांनी दर्शन घेतले. त्या नंतर भाजपाचे जेष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार हे दर्शनाला आले. मात्र व्हीयापी दर्शन बंद आहे असे सांगण्यात आले. त्यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक याना संपर्क केले. मात्र काही वेळाने त्यांना दर्शनाला सोडण्यात आले. त्या नंतर मुनगंटीवार यांनी नाराजी व्यक्त करत महसूल,मंदिर समिती यांच्यात समन्वय नाही. मंदिर समिती कारभारावर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

तर पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील हे पंढरपूरला आले. ते दर्शनला आले असता मंदिराच्या दरवाज्यावर समर्थकांना अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र मंत्र्यांच्या पाठोपाठ मंदिरात घुसून प्रवेश केल्याचे दिसून आले. त्या नंतर त्यांनी आपण लोकप्रतिनिधी आहोत अडीचशे किलोमीटर वरून प्रवास करून येतो. मग दर्शनाला द्यायलाच पाहिजे. माझ्या सोबतचे लोक थेट दर्शनाला सोडल्याची कबुलीही मंत्री पाटील यांनी दिली. मात्र जो उद्देश ठेवून व्हीआयपी दर्शन बंद ठेवले त्या नियमाचा उल्लंघन मंत्र्यांनी केल्याने भाविकांनी नाराजी व्यक्त केली.

### पुढाऱ्यांना आणि समर्थकांना सुबुद्धी द्या

आम्ही दिवस रात्र, खाणे पिणे सोडून विठ्ठलाच्या दर्शनसाठी रांगेत तासन तास उभे राहतो. मात्र अनेक वेळा रांग थांबली जाते. चौकशी केल्यावर समजते मंत्री,अधिकारी आलेत. त्यामुळे दर्शन बंद केले. ते लोक दर्शन घेतात, फोटो काढतात, सत्कार होतो. तो पर्यंत रांग बंद ठेवतात. त्यामुळे किमान वारी होई पर्यंत कोण्या मंत्री,अधिकारी,व अन्य लोकाना सुबुद्धी द्या अशी मागणी भाविकांनी केली आहे.

# सोनम वांगचुक, अभिजीत दिपकेंच्या समर्थनार्थ आदित्य ठाकरे मैदानात

महाईन्यूज । मुंबई

**नीट पेपरफुटीप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक गेल्या १९ दिवसांपासून दिल्लीत उपोषण करत आहेत. कॉक्रोच जनता पार्टीच्या अभिजीत दिपकेंनी उभारलेल्या आंदोलनाला देशभरातून पाठिंबा वाढत असताना, वांगचुक आणि दिपके यांच्या समर्थनात आदित्य ठाकरेंनी मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. वांगचुक आणि दिपकेंना पाठिंबा देण्यासाठी रविवारी (१९ जुलै) शिवतीर्थावर एकत्र येण्याचे आवाहन आदित्य ठाकरेंनी केले आहे. “हा लढा राजकीय पक्षाचा नसून, सर्वांचा आहे”, असेही ठाकरेंनी म्हटले आहे.**






नीट पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि मृत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी आंदोलन उभारले आहे. दिल्लीत गेल्या २५ दिवसांपासून हे आंदोलन सुरु आहे. यात सोनम वांगचुक यांनी सहभागी होत उपोषणाची हाक दिली. गेल्या १९ दिवसांपासून वांगचुक उपोषण करत असून, सरकारकडून अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही. दरम्यान, वांगचुक यांच्या समर्थनात अनेक राजकीय नेते, अभिनेते, सामाजिक कार्यकर्ते उतरले आहेत. आदित्य ठाकरेंनी देखील आता वांगचुक आणि दिपकेंच्या समर्थनात रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

वांगचुक, दिपके आणि युवकांनी पाठिंबा देण्यासाठी व भाजपा सरकारला जाब विचारण्यासाठी एकत्र येऊया, असे आवाहन आदित्य ठाकरेंनी केले आहे. १९ जुलै, रविवारी, शिवतीर्थावर, माँसाहेब मिनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याजवळ ४ वाजता एकत्र येण्याचे आवाहन आदित्य यांनी केले आहे. “हा लढा राजकीय पक्षाचा नसून, सर्वांचा आहे”, असेही ठाकरेंनी पुढे म्हटले आहे. उद्धव ठाकरेंनी देखील काही दिवसांपूर्वी दिपके आणि वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. आता आदित्य यांनी दिपके आणि वांगचुक यांच्या समर्थनात प्रत्यक्ष रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

# आम्ही ट्रम्प यांना ठार मारू

## काळ्या शवपेटीत ट्रम्प यांच्या फोटोसह इराणमध्ये झळकला भलामोठा बॅनर

**महाईन्यूज । इराण**

**अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा तीव्र झाला आहे. दोन्ही देशांनी एकमेकांवर हल्ले करण्यास सुरुवात केली आहे. अलिकडेच इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीला एकत्र आलेल्या जमावाने डोनाल्ड ट्रम्प यांना ठार करा, अशा घोषणा दिल्या. त्यानंतर आता इराणची राजधानी तेहरानमध्ये भलामोठा फलक उभारण्यात आला असून, त्यावर एका काळ्या शवपेटीत डोनाल्ड ट्रम्प यांचा फोटो दिसत आहे, आणि फलकावर “आम्ही ट्रम्प यांना ठार मारू”, असा संदेश लिहिण्यात आला आहे.**



तेहरान शहराच्या मध्यवर्ती भागात हा भलामोठा फलक उभारण्यात आला आहे. त्यावर एका मोठ्या काळ्या शवपेटीत डोनाल्ड ट्रम्प यांचा फोटो दिसत आहे. तर, फलकावर खाली पर्शियन आणि इंग्रजी भाषेत विविध संदेश लिहिण्यात आले आहेत. यात “आम्ही ट्रम्प यांना ठार मारू”, असा इंग्रजी संदेश देखील लिहिण्यात आला आहे. शवपेटीत डोनाल्ड ट्रम्प यांचा काळ्या कोट, लाल रंगाची टाय, हाताची घडी, डोकं आणि पाय शवपेटीतून स्पष्ट दिसतील असे दाखवण्यात आले आहे.

फलकावरील फोटो डोनाल्ड ट्रम्प यांचे अंत्यविधी सदृष्य चित्र दाखविण्यात आले आहे. या फलकावर डोनाल्ड ट्रम्प यांना ठार करु, असा संदेश लिहिण्यात आला आहे. या शिवाय मिनाब शाळेतील मुलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ असाही संदेश लिहिण्यात आला आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात मिनाब येथील शाळेतील अनेक लहान मुलांचा मृत्यू झाला होता. २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या हल्ल्यात अयातुल्ला अली खामेनी यांचा देखील मृत्यू झाला होता.

### अमेरिका-इराणमधील संघर्ष तीव्र

अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा चिघळला असताना तेहरान शहरात हा फलक झळकल्याने इराणने रागाच्या भावनेने पेटून उठल्याचे दिसत आहे. अमेरिकेने गेल्या काही दिवसांत इराणच्या अनेक महत्वाच्या ठिकाणांना लक्ष्य केले आहे. इराणने देखील अमेरिकेच्या आखाती देशातील लष्करी तळांवर हल्ले केल्याचे समोर आले आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनी सर्वांसाठी खुली असल्याचे वक्तव्य करत, होर्मुझमध्ये शुल्क आकारणीचा विचार करत असल्याचे म्हटले आहे. दरम्यान, इराण डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येचा कट रचत असल्याची गुप्त माहिती इस्रायलने अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांना दिली आहे. यानंतर सतर्क झालेल्या अमेरिकेकडून इराणवर हल्ले सुरु करण्यात आल्याची माहिती आहे.




# सोनम वांगचुक यांना शिक्षण मंत्री करा; अरविंद केजरीवालांची मागणी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**नीट पेपरफुटीप्रकरणी दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीने आंदोलन सुरु आहे. या आंदोलनात सोनम वांगचुक गेल्या १९ दिवसांपासून उपोषण करत आहेत. सोनम यांना केंद्र सरकारकडून अद्याप प्रतिसाद मिळाला नसला तरी देशातून विविध राजकीय नेते, अभिनेते, सामाजिक कार्यकर्त्यांनी पाठिंबा दर्शवला आहे. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांना आज जंतर मंतरवर दाखल होत वांगचुक आणि दिपकेंच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. सोनम वांगचुक यांना शिक्षण मंत्री करण्याची मागणी यावेळी केजरीवलांनी केली.**



“स्पर्धा परीक्षा मुलांसाठी स्वप्न असतात, मी पण आयआयटीची परीक्षा दिली आहे, आयआयटीत गेलो आहे. पण, त्यावेळी पेपरफुटी होत नव्हती. माझी दोन्ही मुलं आयआयटीत आहेत. त्यांचे पेपरही लीक झाले नाहीत. पेपरफुटीमुळे मुलांचा आत्मविश्वास कमी होतो. ही देशासाठी धोक्याची घंटा आहे. प्रत्येक वर्षी पेपरफुटी होत आहे. २०२४ मध्ये पेपरफुटी झाली त्याच्या मास्टरमाईंडला जामीन देण्यात आला. आता ही सिस्टमच झाली आहे. पेपरफुटी होते, समिती बसते, तपास होतो, अटक होतात आणि नंतर जामीन होतो. त्यानंतर पुन्हा पेपरफुटीची तयारी होते”, अशी टीका अरविंद केजरीवाल यांनी जंतर मंतरवरुन बोलताना केली.

“नीट पेपरफुटीनंतर २० विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली ही आमच्या घरातील मुलं होती. सीबीएसईची मूल्यांकन पद्धतीत घोळ आढळून आला पण, त्याबाबत एक एफआयआर देखील दाखल केला नाही. देशात पुढच्या वर्षी पुन्हा पेपरफुटी होणार, पुन्हा विद्यार्थी आत्महत्या करतील. या शिक्षण व्यवस्थेला बदलावे लागेल”, असे अरविंद केजरीवाल म्हणाले. अरविंद केजरीवाल यांनी यावेळी २०११ सालीच्या अण्णा हजारे यांच्या आंदोलनाचा दाखला देत २०१४ साली तत्कालिन सरकार (काँग्रेस) कोसळल्याचे सांगितले.

अरविंद केजरीवालांनी यावेळी कॉक्रोच जनता पार्टी आणि युवकांचा आवाज ऐकूण घेण्याचे आवाहन सरकारला केले. अन्यथा तीन वर्षानंतर तुमच्या देखील या सरकारबरोबर त्यावेळी २०१४ साली काँग्रेसबरोबर झाले तेच होईल, असा इशारा दिला. हे सरकार देखील अहंकारात बुडाल्याची टीका केजरीवाल यांनी केली.

धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेऊन सोनम वांगचुक यांना देशाचे शिक्षण मंत्री करण्याची मागणी यावेळी केजरीवाल यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी या निर्णयाला तयार होणार नाहीत, असेही केजरीवाल पुढे म्हणाले. केजरीवालांनी २० तारखेच्या आंदोलनात (संसद चलो) मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन देखील यावेळी केले.

# शहनाजच्या 'इश्कनामा'चा ट्रेलर प्रदर्शित



अभिनेत्री शहनाज गिल आणि अभिनेता जय रंधावा यांच्या आगामी 'इश्कनामा' या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून, तो सोशल मीडियावर चांगलाच चर्चेत आला आहे. भारत-पाकिस्तान सीमेच्या पार्श्वभूमीवर उलगडणारी ही प्रेमकथा भावनिक, हळवी आणि संघर्षमय असल्याचे ट्रेलरमधून दिसून येते. ट्रेलर पाहिल्यानंतर प्रेक्षकांकडून सकारात्मक प्रतिक्रिया मिळत असून, शहनाजच्या अभिनयाचेही कौतुक होत आहे.

'इश्कनामा' हा केवळ प्रेमकथेवर आधारित चित्रपट नसून, दोन वेगवेगळ्या देशांतील आणि दोन भिन्न धर्मांतील व्यक्तींमधील नात्याचा प्रवास दाखवणारा चित्रपट आहे. प्रेमाला सीमा नसते, धर्माची बंधने नसतात आणि खरी भावना सर्व अडथळ्यांवर मात करू शकते, असा संदेश या चित्रपटातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.


चित्रपटाची कथा १९८२ च्या काळात घडते. त्या काळातील भारत-पाकिस्तान संबंध, सामाजिक परिस्थिती आणि सीमावर्ती भागातील वातावरण यांची झलक ट्रेलरमध्ये पाहायला मिळते.

या कथेत जय रंधावा यांनी साकारलेला 'निम्मा' हा तरुण काही कामानिमित्त पाकिस्तानमध्ये जातो. तेथे त्याची भेट 'नसीमा' या तरुणीशी होते. नसीमाची भूमिका शहनाज गिलने साकारली आहे.

पहिल्या भेटीनंतर निम्मा आणि नसीमा यांच्यात मैत्री होते आणि हळूहळू त्या मैत्रीचे रूप प्रेमात बदलते. मात्र, दोघांचे देश वेगळे आहेत, धर्म वेगळा आहे आणि त्यांच्या प्रेमाला समाजाची मान्यता मिळणे सोपे नसते. तरीही दोघेही आपल्या प्रेमासाठी एकमेकांच्या सोबत उभे राहण्याचा निर्णय घेतात.

कथेला मोठे वळण तेव्हा मिळते, जेव्हा नसीमा निम्मासमोर एक इच्छा व्यक्त करते. तिला भारत प्रत्यक्ष पाहायचा असतो. आपल्या प्रेयसीची ही इच्छा पूर्ण करण्यासाठी निम्मा मोठा धोका पत्करतो आणि तिला गुपचूप भारतात घेऊन येतो. तो तिला देशातील अनेक ठिकाणी फिरवतो आणि तिची पूर्ण काळजी घेतो. त्यानंतर तिला सुरक्षितपणे पुन्हा पाकिस्तानात सोडण्यासाठीही तो जातो.

मात्र, याच ठिकाणी कथेत मोठा संघर्ष सुरू होतो. नसीमाच्या वडिलांना आपल्या मुलीचे एका भारतीय तरुणावर प्रेम असल्याचे समजते. ते संतापतात आणि निम्माला कैद करतात. त्याच्यावर विविध प्रकारचे अत्याचार केले जातात. तरीही निम्मा आपल्या प्रेमापासून मागे हटत नाही. प्रत्येक संकटाचा सामना करत तो नसीमासाठी लढत राहतो.




## आदिनाथ अन् ऊर्मिलाचा घटस्फोट

मराठी कलाविश्वातील सर्वात लोकप्रिय आणि आदर्श समजली जाणारी जोडी आदिनाथ कोठारे आणि ऊर्मिला कानिटकर अखेर अधिकृतपणे वेगळी झाली आहे. गेल्या काही वर्षांपासून त्यांच्यात दुरावा आल्याच्या चर्चा रंगत होत्या, मात्र आता त्यांनी सोशल मीडियावर एकत्रित पोस्ट शेअर करत घटस्फोटाची अधिकृत घोषणा केली आहे. लग्नाच्या १५ वर्षांनंतर या जोडीने संसार मोडण्याचा निर्णय घेतल्याने त्यांच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. "आमचे मित्र, मीडिया आणि हितचिंतकांनो, खूप विचार केल्यानंतर, आम्ही, आदिनाथ म. कोठारे आणि ऊर्मिला कानेटकर यांनी एकमेकांच्या संमतीने आणि सामंजस्याने पती-पत्नी म्हणून वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. जोडीदार म्हणून आमचा प्रवास इथे संपत असला, तरी आमची मुलगी जिज़ा हिच्यासाठी आम्ही नेहमी एकत्र आहोत. ती आमचं सर्वस्व आहे. तिला भरपूर प्रेम, सुरक्षितता आणि पाठिंबा मिळावा, यासाठी आम्ही आनंदाने आणि पूर्ण जबाबदारीने एकत्र येऊन तिचे संगोपन (Co-parenting) करत आहोत. आमच्या मनात एकमेकांबद्दल आणि एकत्र घालवलेल्या वर्षांबद्दल नेहमीच आदर राहील. गेल्या काही वर्षांत मीडिया आणि तुम्हा सगळ्यांनी आम्हाला जे भरभरून प्रेम आणि साथ दिली आहे, त्यासाठी आम्ही मनापासून आभारी आहोत. आयुष्याच्या या नव्या टप्प्यावरही तुमचे हे प्रेम आणि आशीर्वाद आमच्या पाठीशी असेच राहतील, अशी आम्हाला आशा आहे. म्हणूनच, आमच्या या खाजगी प्रवासात मीडिया आणि जनतेने आमच्या प्रायव्हसीचा (Privacy) आदर करावा, अशी आमची नम्र विनंती आहे. या विषयावर आमचे हेच एकमेव वक्तव्य असेल आणि यापुढे आम्ही यावर कोणतीही कमेंट किंवा चर्चा करणार नाही. तुमचं प्रेम आणि समजूतदारपणाबद्दल मनापासून धन्यवाद."

आदिनाथ आणि ऊर्मिला

## 'क्वीन 2' ची प्रतीक्षा वाढली



प्रसिद्ध अभिनेत्री कंगना रनौत कुठल्या न कुठल्या कारणाने सदैव चर्चेत असते. सध्या ती स्वतःच्या आगामी चित्रपटावरून चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. अलिकडेच प्रदर्शित 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटातील तिच्या भूमिकेचे कौतुक झाले होते. आता तिने स्वतःच्या पुढील चित्रपटाचे चित्रिकरण पूर्ण केले आहे. कंगना पुढील काळात अनेक चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यात सर्वाधिक प्रतीक्षा ही तिच्या 'क्वीन 2' चित्रपटाची केली जात आहे. सुमारे 13 वर्षांनी क्वीन या चित्रपटाचा सीक्वेल निर्माण केला जात आहे. कंगनाने चित्रिकरण संपल्यावर आनंद व्यक्त करणारा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये कंगना ही दिग्दर्शक विकास बहलसोबत दिसून येत आहे. क्वीन 2 हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे. तर क्वीन हा चित्रपट 2013 रोजी प्रदर्शित झाला होता आणि याला प्रेक्षकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला होता. कंगना सध्या अभिनेता आर. माधवनसोबत 'तनु वेड्स मनु 3' चित्रपटात काम करणार आहे. याचे चित्रिकरण पुढील काळात सुरू होण्याची शक्यता आहे.

# ‘कमबॅक किंग’ अर्जेंटिना!

## फिफा वर्ल्डकप २०२६; नॉर्वेचा Viking अन् इंग्लंडचा King ही रेसमध्ये

**महाईन्यूज । पोर्तुगल**

**तुम्ही जर फुटबॉलचे चाहते असाल आणि तुमचे हृदय कमजोर असेल, तर यंदाच्या विश्वचषकात अर्जेंटिनाचे सामने पाहणे म्हणजे तुमच्यासाठी एक मोठी कसोटीच ठरली असती! स्पर्धेतून कधीही गाशा गुंडाळावा लागेल अशा बिकट परिस्थितीतून मार्ग काढत, गतविजेत्या अर्जेंटिनाने पुन्हा एकदा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. 'ला अल्बिसेलेस्ते' (आकाशी निळा आणि पांढरा संघ) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या संघाला फुटबॉल जगतात 'कमबॅक किंग' का म्हणतात, याचा थरार संपूर्ण जगाने अनुभवला.**



या विश्वचषकातील अर्जेंटिनाचा प्रवास एखाद्या बॉलिवूड ब्लॉकबस्टर सिनेमापेक्षा कमी नव्हता. 'राउंड ऑफ ३२' मध्ये नवख्या केप व्हर्डे संघाने गतविजेत्यांना थेट अतिरिक्त वेळेत खेचून २-२ अशा बरोबरीत रोखले होते. पण, दबावाखाली कसे खेळायचे हे ठाऊक असलेल्या अर्जेंटिनाने अखेर ३-२ ने सामना खिशात घातला.

पण खरा थरार तर 'राउंड ऑफ १६' मध्ये पाहायला मिळाला. इजिप्तविरुद्धच्या सामन्यात अखेरची १० मिनिटे शिल्लक असताना अर्जेंटिना ०-२ असा पिछाडीवर होता. कोणत्याही संघाचे अवसान गळावे अशा या क्षणी ऑप्टाच्या आकडेवारीनुसार अर्जेंटिनाच्या विजयाची शक्यता अवघी ०.६% उरली होती! मात्र, त्यानंतर फुटबॉलच्या इतिहासातील सर्वात अविश्वसनीय चमत्कार घडला. अर्जेंटिनाने निर्धारित वेळेतच सलग ३ गोल डागत ३-२ ने विजय खेचून आणला. विश्वचषकाच्या इतिहासात अतिरिक्त वेळेत न जाता, २ गोलने पिछाडीवर असताना निर्धारित वेळेत सामना जिंकण्याचे हे आजवरचे सर्वात थरारक पुनरागमन ठरले.

उपांत्य फेरीत अर्जेंटिनासमोर त्यांचा कट्टर प्रतिस्पर्धी इंग्लंड उभा होता. सामन्याचा पूर्वार्ध कमालीचा संथ झाला. दोन्ही संघांनी बचावात्मक पवित्रा घेतल्यामुळे पहिल्या ३० मिनिटांत एकही शॉट लागला नाही, जो १९६६ नंतरचा एक विक्रमच ठरला. मध्यंतरापर्यंत सामना ०-० असाच होता.

पण उत्तरार्धात सामन्याने अचानक कात टाकली. ५५ व्या मिनिटाला इंग्लंडच्या अँथनी गॉर्डनने गोल केला आणि अटलांटाच्या स्टेडियममध्ये एकच जल्लोष झाला. इंग्लंड १-० ने आघाडीवर होते आणि अर्जेंटिना बॅकफूटवर गेला होता.

### फायनलमध्ये रंगणार 'महायुद्ध'

आता रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात एका बाजूला संकटातून तावून सुलाखून निघालेला अर्जेंटिना आहे, तर दुसऱ्या बाजूला सलग ३७ सामने अजिंक्य राहण्याचा युरोपियन विक्रम करणाऱ्या स्पेनचे आव्हान आहे. हा सामना म्हणजे फुटबॉल इतिहासातील एक महासंग्राम असेल. पण एक गोष्ट मात्र नक्की, जोपर्यंत मैदानात निळ्या-पांढऱ्या जर्सीत लिओनेल मेस्सी आणि त्याचा संघ उभा आहे, तोपर्यंत विजयाची खात्री कोणालाच देता येणार नाही. वय वर्ष ३९, पण मैदानावरचा तोरा तोच! फुटबॉलचा जादूगार लिओनेल मेस्सी या सामन्यात सुरुवातीला शांत दिसत असला, तरी मोक्याच्या क्षणी त्यानेच दोन्ही गोलचे असिस्ट (पास) केले. विश्वचषकाच्या इतिहासात आता मेस्सीच्या नावावर सर्वाधिक १२ असिस्टची नोंद झाली आहे.

# 'पंजाब किंग्स'चा वर्ल्ड रेकॉर्ड मोडीत! 'वॉशिंग्टन फ्रीडम'चा नवा विक्रम

**महाईन्यूज । न्यूयॉर्क**

**टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात मोठा यशस्वी रन्स चेस (धावांचा पाठलाग) करण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड पंजाब किंग्सच्या नावावर होता. मात्र, बुधवारी(१५ जुलै) अमेरिकेतील एका संघाने हा रेकॉर्ड मोडीत काढला आहे. या स्पर्धेतील एलिमिनेटर सामन्यात ऑस्ट्रेलियन दिग्गज स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखालील वॉशिंग्टन फ्रीडम संघाने पुरुष टी-२० क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात मोठा रन्स चेस करून नवा इतिहास रचला आहे.**





### स्टीव्ह स्मिथने पोलार्डच्या षटकात सामन्याचे चित्रच बदलले

मैदानात एका बाजूने स्टीव्ह स्मिथ आणि दुसऱ्या बाजूने अँड्रियस गॉस यांनी विरोधी संघाच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. १० ओव्हर्समध्ये संघाने १२६ धावा केल्या आणि सामन्यात चुरस निर्माण झाली. पण त्यानंतर धावगतीला थोडा ब्रेक लागला; ११व्या ओव्हरमध्ये ६ आणि १२व्या ओव्हरमध्ये १२ धावा आल्या. मात्र, १३व्या ओव्हरमध्ये गॉसने ४ षटकार ठोकून सामन्याचे चित्रच बदलले; या ओव्हरमध्ये एकूण २९ धावा निघाल्या. १४व्या ओव्हरमध्ये स्टीव्ह स्मिथने कायरन पोलार्डला लक्ष्य करत २१ धावा वसूल केल्या. यानंतर १५व्या ओव्हरमध्ये गॉस आणि स्मिथने मिळून तब्बल ३१ धावा करत सामना पूर्णपणे आपल्या बाजूने झुकवला.

वॉशिंग्टनच्या संघाने तब्बल २६७ धावांचे आव्हान अत्यंत सहजपणे पार केले. विशेष म्हणजे, या सामन्यात एमआय न्यूयॉर्कसाठी निकोलस पूरनने देखील वादळी शतक ठोकले होते, मात्र त्याची ही कामगिरी अखेर वाया गेली.

आयपीएल २०२६ मध्ये पंजाब किंग्सने स्वतःचाच जुना रेकॉर्ड मोडीत काढत नवा वर्ल्ड रेकॉर्ड बनवला होता. दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध पंजाबने २६५ धावा चेस केल्या होत्या. मात्र, आता वॉशिंग्टन फ्रीडमने एमआय न्यूयॉर्कविरुद्ध २६७ धावांचे लक्ष्य यशस्वीपणे गाठून नवा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

यापूर्वी पंजाब किंग्सने २०२४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध २६२ धावांचे लक्ष्य देखील चेस केले होते; पण आा जगातील सर्वात मोठ्या रन्स चेसचा मान वॉशिंग्टन फ्रीडमच्या नावावर जमा झाला आहे.

२६७ धावांच्या या विशाल आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी जेव्हा स्टीव्ह स्मिथचा वॉशिंग्टन फ्रीडम संघ मैदानात उतरला, तेव्हा सुरुवातीच्या १३ चेंडूंमध्येच त्यांचे २ फलंदाज बाद झाले होते. ३ ओव्हर्सनंतर संघाची धावसंख्या २ बाद १८ अशी होती. इतक्या मोठ्या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग केला जाऊ शकतो आणि तोही १९व्या ओव्हरमध्येच संपेल, अशी कल्पनाही कदाचित कोणी केली नसेल. पण यानंतर वॉशिंग्टनच्या संघाने पुढच्या ३ ओव्हर्समध्ये आणखी ४३ धावा जोडल्या आणि पॉवरप्ले संपला तेव्हा धावसंख्या २ बाद ६१ अशी होती. अजूनही विजयासाठी १४ ओव्हर्समध्ये २०६ धावांची गरज होती, पण स्मिथच्या संघाने हार मानली नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

। शुक्रवार ।

दि. 17 जुलै 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# मोशी दुर्घटनेवर सभागृहात गदारोळ

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

मोशी येथील कचरा डेपो दुर्घटनेचे पडसाद बुधवारी झालेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत तीव्रपणे उमटले. दुर्घटनेप्रकरणी केवळ अधिकाऱ्यांचे निलंबन करून चालणार नाही, तर जबाबदारांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांनी केली. यावेळी प्रशासनाच्या भूमिकेवरही तीव्र टीका करण्यात आली.

शिवसेना नेत्या सुलभा उबाळे यांनी मोशी डेपोबाबत पूर्वीपासून आंदोलन करूनही दुर्लक्ष झाल्याचा आरोप केला. ठेकेदार आणि अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न झाला असून, दुर्घटनेस जबाबदार असलेल्या सर्वांवर फौजदारी कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. अनधिकृत बांधकामांना परवानगी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांचीही चौकशी करून कारवाई करावी, असे त्या म्हणाल्या.

संदीप वाघेरे यांनी हरित लवाद आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनांकडे दुर्लक्ष झाल्याचा मुद्दा उपस्थित केला. कचऱ्याचा डोंगर नियोजित मर्यादेपेक्षा वाढल्यानंतरही उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, असा आरोप त्यांनी केला. यावेळी भाजप नगरसेवकांनी आक्षेप घेतल्याने सभागृहात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

राहुल कलाटे यांनी शहरात क्षेत्रनिहाय कचरा प्रक्रिया केंद्रांची गरज व्यक्त करत कर्करोग रुग्णांचा अभ्यास, सीमावर्ती भागातून येणाऱ्या कचऱ्यावर नियंत्रण आणि आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याची मागणी केली.

भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी मोशीकरांनी अनेक वर्षे कचऱ्याचा त्रास सहन केल्याचे सांगत इंदोरच्या धर्तीवर कचरा व्यवस्थापनाची अंमलबजावणी करण्याची सूचना केली. सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी वजनाऐवजी कचरा कमी करणाऱ्या यंत्रणेला प्रोत्साहन देणाऱ्या धोरणाची गरज व्यक्त केली.

महापौर रवि लांडगे यांनी मोशी दुर्घटना पिंपरी-चिंचवडसाठी काळा दिवस असल्याचे सांगत संबंधित कंपनीकडून मृतांच्या वारसांना ५० लाख रुपयांची नुकसानभरपाई मिळावी यासाठी प्रयत्न केले जातील. तसेच वारसदारांना महापालिकेत कायमस्वरूपी नोकरी देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्याचे त्यांनी सांगितले.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शहरात यापुढे नवीन डम्पिंग ग्राउंड उभारले जाणार नसून, त्याऐवजी अत्याधुनिक व दुर्गंधीमुक्त कचरा प्रक्रिया केंद्रे उभारली जातील, अशी घोषणा केली. तसेच महावितरणच्या धोकादायक ठिकाणी असलेल्या डीपी उंच भागात स्थलांतरित करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मोशी दुर्घटनेतील बचावकार्याबाबत होत असलेल्या टीकेलाही आयुक्तांनी उत्तर दिले. एनडीआरएफ, लष्कर आणि अग्निशमन दलाने जीवाची बाजी लावून बचावकार्य केले असून, अपूर्ण माहितीच्या आधारे त्यांचा अपमान होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.







# प्रमुख विरोधी पक्ष राष्ट्रवादीची भूमिका स्पष्ट

## सर्वसाधारण सभेमध्ये नगरसेवक संदीप वाघेरेंचा अपवाद कोणीही बोलले नाही!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मोशी कचरा डेपो दुर्घटनेत नऊ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत तब्बल पाच तास कचरा प्रश्नावर चर्चा झाली. सत्ताधारी भाजपा, शिवसेना (शिंदे गट), आरपीआय तसेच विविध पक्षांच्या नगरसेवकांनी प्रशासन, पर्यावरण विभाग आणि संबंधित ठेकेदारांवर जोरदार टीका केली. मात्र, शहरातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने या प्रकरणात तुलनेने संयमी भूमिका घेतल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून आले.**




विशेष म्हणजे, महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी प्रशासनाच्या कारभारावर आक्रमक भूमिका घेतली आणि जोडीला राजकीय 'स्टेटमेंट्स' करीत वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हरित लवादाच्या नोटिसा, प्रदूषण मंडळाचे आक्षेप, बायोमायनिंगमधील अनियमितता, कचरा डेपोच्या व्यवस्थापनातील त्रुटी आणि पर्यावरण विभागाचे प्रमुख संजय कुलकर्णी यांच्यावर त्यांनी थेट आरोप केले. "कारवाई झाली नाही, तर न्यायालयात जाईन," असा इशाराही त्यांनी दिला. मात्र, त्यांच्याशिवाय राष्ट्रवादीच्या अन्य सदस्यांनी या विषयावर कोणतीही ठळक भूमिका घेतली नाही.

यामागे एक महत्त्वाचा राजकीय संदर्भ असल्याची चर्चा शहराच्या राजकीय वर्तुळात सुरू आहे. दुर्घटनेनंतर राष्ट्रवादीच्या सर्वेसर्वा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या वतीने विशेष कार्याधिकारी (OSD) विकास पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला होता. त्यावेळी भाजपातून राष्ट्रवादीत दाखल झालेले आणि राजकीय महत्त्वाकांक्षेतून भाजपा आणि स्थानिक आमदारांना 'टार्गेट' करणाऱ्या स्वयंघोषित नेत्या आणि राजकीय रणनितीकार यांनी राजकीय चौकटीतून मांडण्याचा प्रयत्न केल्याचे बोलले जाते. त्यावर विकास पाटील यांनी, "अशा दुर्घटनेत राजकारण करू नका. सध्या बचावकार्य महत्त्वाचे आहे," असा स्पष्ट संदेश दिल्याची माहिती समोर आली होती.

### मोशी कचरा डेपोची क्षमता केव्हाच संपली

दुसरीकडे, सभागृहात शिवसेना (शिंदे गट)च्या उपनेत्या सुलभा उबाळे यांनी मोशी कचरा डेपो प्रकरणावर बोलताना, "मोशी कचरा डेपोची क्षमता केव्हाच संपली आहे. हजारो कोटी रुपये खर्च होऊनही केवळ टक्केवारीचे राजकारण झाले," असा आरोप केला. याचवेळी त्यांनी पर्यावरण विभागाचे प्रमुख संजय कुलकर्णी, तत्कालीन आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. मात्र, या भाषणादरम्यान राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते योगेश बहल यांच्यावर अप्रत्यक्ष दोषी ठरवण्यात आले. ही बाब बहल समर्थकांच्या जिव्हारी लागली आहे. विशेष म्हणजे, सभागृहातील चर्चेदरम्यान राष्ट्रवादीच्या कोणत्याही सदस्याने या टीकेला सार्वजनिकरित्या प्रत्युत्तर दिले नाही.

### चार दशकांपासून कचरा डेपोचा त्रास

राजकीय दृष्टिकोनातून पाहता, मोशी दुर्घटना हा आगामी महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठरू शकतो. मोशी, भोसरी, चऱ्होली, डुडुळगाव आणि परिसरातील नागरिक गेल्या चार दशकांपासून कचरा डेपोचा त्रास सहन करत असल्याचा मुद्दा सत्ताधारी भाजपाच्या नगरसेवकांनीच सभागृहात उपस्थित केला. पुनावळे येथे नवीन कचरा डेपो सुरू करण्यापासून ते शहरात प्रभागनिहाय कचरा प्रक्रिया केंद्रे उभारण्यापर्यंत विविध सूचना मांडण्यात आल्या.

# महापालिकेकडून ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत बसपास योजना

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना, तसेच महानगरपालिका हद्दीतील शासनमान्य खासगी शाळा व महानगरपालिकेच्या सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना घर ते शाळा व शाळा ते घर अशा स्वरूपाचा बसचा मोफत पास देण्यास मान्यता देण्यात आली आहे.**






> महानगरपालिकेने सर्व मुख्याध्यापकांनी पात्र विद्यार्थ्यांची यादी वेळेत सादर करून अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा, पालकांनीही निर्धारित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करून आपल्या पाल्यांसाठी मोफत बसपास योजनेचा लाभ घ्यावा.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

तसेच शासनमान्य खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनी बसपासच्या एकूण रकमेपैकी २५ टक्के रक्कम चलनाद्वारे महानगरपालिका कोषागारात भरून ते चलन अर्जासोबत पीएमपीएमएलकडे सादर केल्यानंतर बसपास देण्यात येणार आहे,यास महापालिका सभेने मान्यता दिली आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी मागील शैक्षणिक वर्षात किमान ७५ टक्के उपस्थिती पूर्ण केलेली असावी. विद्यार्थ्यांच्या घरापासून शाळेचे अंतर किमान २ कि.मी. किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. ही योजना महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिका व शासनमान्य खासगी शाळांमधील इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू राहणार आहे.

विद्यार्थ्यांनी निर्धारित नमुन्यातील अर्ज भरून रहिवासी पुरावा, आधार कार्ड अथवा इतर पत्ता असलेले ओळखपत्र, शाळेचे प्रमाणपत्र तसेच दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडून संबंधित शाळेत जमा करावेत. खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनी निर्धारित रक्कम पीएमपीएमएलच्या अधिकृत डेपोमध्ये भरून अर्ज सादर करावेत, तर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना बसपास पूर्णपणे मोफत देण्यात येणार आहे.

योजनेअंतर्गत अर्ज वाटप व स्वीकार प्रक्रिया १५ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत होणार असून, बसपास तयार करणे व वितरण १५ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२६ दरम्यान करण्यात येईल. या बसपासचा लाभ ३० जून २०२७ पर्यंत उपलब्ध राहणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारा होणार आहे. पालकांवरील वाहतूक खर्चाचा ताण कमी होण्यास मदत होणार असून अधिकाधिक विद्यार्थ्यांना नियमितपणे शाळेत जाण्यास प्रोत्साहन मिळेल.

# शिक्षकांवर बीएलओ कामाचा ताण

## मतदार यादी पुनरीक्षण आणि शाळेची दुहेरी जबाबदारी; पावसात घरभेटी, मानसिक तणावात शिक्षक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पवन मावळमध्ये सध्या मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षण आणि पडताळणी मोहिमेला वेग आला असून, या मोहिमेसाठी मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, शाळा नुकत्याच नियमितपणे सुरू झालेल्या असताना अध्यापनाचे काम आणि त्याच वेळी मतदारयादी पडताळणीची जबाबदारी यामुळे शिक्षकांवर दुहेरी ताण निर्माण झाला आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या अध्यापनावरही त्याचा परिणाम होत असल्याची भावना शिक्षकांमधून व्यक्त होत आहे.**



शिक्षण विभाग आणि निवडणूक प्रशासनाच्या सूचनांनुसार नियुक्त शिक्षकांना शाळेचे नियमित कामकाज पूर्ण करून दुपारनंतर तसेच सुटीच्या दिवशी मतदारयादी पडताळणीचे काम करावे लागत आहे. या कामात प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहितीची खातरजमा करणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे आणि नोंदी अद्ययावत करणे अपेक्षित आहे. मात्र, सध्या पावसाळी हंगाम सुरू असून, ग्रामीण भागातील बहुतांश नागरिक सकाळीच शेतीची कामे किंवा रोजंदारीसाठी घराबाहेर पडत असल्याने शिक्षकांना संबंधित मतदार घरी भेटत नाहीत.

अनेक गावांमध्ये दुपारच्या वेळी घरात केवळ ज्येष्ठ नागरिक किंवा लहान मुलेच आढळतात. त्यामुळे आवश्यक माहिती मिळत नसल्याने शिक्षकांना त्याच घराकडे दोन ते तीन वेळा फेऱ्या माराव्या लागत आहेत. वारंवार भेटी देऊनही पडताळणी पूर्ण होत नसल्याने कामाचा ताण वाढत आहे. दुसरीकडे शाळेत विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचेही मोठे आव्हान शिक्षकांसमोर उभे आहे. विशेषतः शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा पाया मजबूत करण्यासाठी शिक्षकांची वर्गात उपस्थिती आवश्यक असते. अशा काळात मोठ्या प्रमाणावर निवडणुकीच्या कामात शिक्षक गुंतल्याने विद्यार्थ्यांच्या नियमित अध्यापनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पालकांमधूनही याबाबत चिंता व्यक्त होत असून, शैक्षणिक कामकाजाला प्राधान्य देण्याची मागणी पुढे येत आहे. एसआयआर काम सुरू झाल्यापासून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शाळेत सकाळपासून संध्याकाळपर्यंत नागरिक आपल्या वेळेनुसार वर्गात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकवता येत नाही. सकाळी साडेसात ते साडेबारापर्यंत शाळा आणि यानंतर एसआयआरचे काम दुपारी करण्यास सांगितले आहे. यामुळे मोठी कसरत करावी लागते.

### शिक्षक मानसिक तणावात

शिक्षकांना एका बाजूला विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी तर, दुसऱ्या बाजूला बीएलओ म्हणून ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याचे दडपण अशा दुहेरी जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत आहेत. पाऊस, चिखल आणि दुर्गम भागातील प्रवास यामुळे या कामात अधिकच अडचणी निर्माण होत आहेत. वेळेअभावी मानसिक आणि शारीरिक ताण वाढत असल्याचे अनेक शिक्षक सांगत आहेत. शैक्षणिक कामकाज आणि निवडणूक प्रक्रिया या दोन्ही महत्त्वाच्या असल्या तरी दोन्ही जबाबदाऱ्या एकाच वेळी पार पाडताना शिक्षकांची मोठी कसरत होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होणार नाही, यासाठी बीएलओच्या कामाचे योग्य नियोजन करावे किंवा पर्यायी यंत्रणा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शिक्षकांकडून होत आहे.

# मोशी दुर्घटनाग्रस्तांच्या कुटुंबीयांना भक्कम आधार; दोषींवर कठोर कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पात घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आज झालेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सभेत दुर्घटनाग्रस्त कुटुंबीयांना आर्थिक व सामाजिक आधार देण्यासह दुर्घटनेची सखोल चौकशी, दोषींवर कठोर कारवाई आणि शहरातील कचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.**




दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबीयांना महानगरपालिकेमार्फत रुपये १० लाखांची आर्थिक मदत, तर जखमींना प्रत्येकी रुपये १ लाखांची मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. ठेकेदार मे. अँटोनी लारा यांच्यामार्फत मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसाना ५० लाख मदत मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार. तसेच मृतांच्या मुलांच्या संपूर्ण शिक्षणाचा खर्च करण्यात येणार असून, मृत व्यक्तींच्या कुटुंबातील पात्र वारसांना महानगरपालिका सेवेत नोकरी मिळण्याच्या दृष्टीने शासनाकडे आवश्यक प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

दुर्घटनेच्या अनुषंगाने मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांना सेवेतून निलंबित करून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. दुर्घटनेची कारणे, तांत्रिक व प्रशासकीय त्रुटी आणि संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी उच्चस्तरीय समितीमार्फत सखोल चौकशी करण्यात येणार आहे. तसेच अँटोनी लारा कंपनीचे प्रकल्प प्रमुख व सुरक्षा निरीक्षक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासोबतच, शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम व विकेंद्रीकृत करण्याच्या दृष्टीने महानगरपालिका सभेत यापूर्वी झालेल्या निर्णयानुसार शहरातील सर्व प्रभागांमध्ये दुर्गंधीमुक्त कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची प्रक्रिया तातडीने राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

"दुर्घटनेत जीव गमावलेल्या सहकाऱ्यांच्या कुटुंबीयांना केवळ आर्थिक मदत देऊन आमची जबाबदारी संपणार नाही. त्यांच्या मुलांच्या भविष्याची जबाबदारी स्वीकारत, पात्र वारसांना रोजगाराची संधी मिळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल. त्याचवेळी या दुर्घटनेला जबाबदार असणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. निष्पक्ष चौकशीतून जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल," अशी भूमिका महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केली.

### सतर्क राहण्याच्या सूचना

दुर्घटनेनंतर महापालिका प्रशासनाने सर्व संबंधित विभागांना तातडीने सतर्क राहण्याच्या सूचना देत शहरातील सुरू असलेल्या प्रकल्पांचे सुरक्षा लेखापरीक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी सर्व विकासकामांमध्ये सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्यात येणार असून, त्यासाठी स्वतंत्र देखरेख यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे. कचरा प्रक्रिया प्रकल्पांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून देण्याबरोबरच नियमित प्रशिक्षण देण्यावरही भर दिला जाणार आहे.

# 200 Volunteers Power Wari Seva

## Dr. Sushant Patil Group completes a remarkable 22-hour non-stop service initiative

**MahaENews | PUNE**

**The Dr. Sushant Patil Group Wariseva 2026, a noble community service initiative organized under the banner of the Anuja Sushant Patil Global Foundation, concluded successfully in an atmosphere filled with devotion, compassion, and enthusiasm. On the occasion of the Ashadhi Wari, more than 200 volunteers, along with the faculty, staff, and students of Dr. Sushant Patil Group, dedicated themselves to serving the Warkaris continuously for over 22 hours.**



As part of this large-scale service initiative, thousands of Warkaris were provided with freshly prepared meals, raincoats, umbrellas, drinking water bottles, and other essential supplies to support them on their sacred pilgrimage. The spiritual ambiance was further enriched through devotional music, bhajans, abhangs, and cultural performances that welcomed and uplifted the devotees.

The initiative was successfully carried out under the inspiring leadership of Founder Dr. Sushant V. Patil and Managing Director Adv. Anuja Sushant Patil, whose vision and guidance made this humanitarian effort possible. Executive Director Hon. Vidyanand Mankar also played a significant role in supporting and strengthening this noble cause.

The event was graced by the presence of Principal Dr. Suresh Mali, Dr. Suresh Shirbhadurkar, Dr. Meghna Bhilare, Prof. Rajaram Golgire, Central Registrar Shri Pradip Khandave, Chief Accounts Officer Shri Sanjay Bhor, and Chief Financial Officer (CFO) Shri Rohan Pawar, Mr. Ashish Jagtap.

The overall planning and coordination of the Wariseva initiative were efficiently led by Creative and Cultural Director Mr. Shreyas Deshpande, whose meticulous planning ensured the smooth execution of the entire event.The Student and Volunteer Management Team, comprising Rajvardhan Gadekar, HR Madhura Shinde, HR Mihir Jadhav, EA Nancy Cowan, Siddhu Jadhav, Prof. Akash Gaikwad, Indu Singh, Shraddha Pendalwar, Prof. Sumit Hulawale, Nikhila Alhat, Savita More, Rameshwar Shendge, and HR Prachi, managed volunteer coordination and on-ground operations with remarkable efficiency.

The Cultural Committee, led by Mr. Siddhu Jadhav, created a spiritually vibrant atmosphere through devotional performances and musical presentations.

The Food Preparation and Distribution Team, including Parmeshwar Raut, Atul Dhumal, Vitthal Raut, and Suraj, ensured the seamless preparation and distribution of meals. The Procurement and Distribution Team, consisting of Jivan Bajare, Sushant Joshi, Akshay, Lakshman Mastude, Sameer, and Ajit, efficiently handled the purchase and distribution of all essential materials.

The event's Media and Social Media coverage was managed by Unmesh Korde, Mangesh Dhole, Jay Patole, Nikhil Lade, Raju Palaskar, Vivek Jori, Shubham Hardikar, Raj Ingole and their dedicated media team, who documented and shared the spirit of the event across various platforms.

The organization also expressed its heartfelt gratitude to Mayur Tatuskar, Anckur Shivarkar, and Sandip Inamake Studio for their selfless support and valuable contribution to the success of this humanitarian initiative.

# Unity in Diversity: India's Greatest Strength

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE



"The beauty of a rainbow lies not in one colour, but in the harmony of many."

India is much like the Rainbow. From the snow-covered Himalayas to the sun-kissed beaches of the south, from hundreds of languages and colourful festivals to countless traditions and cuisines, our country is a beautiful blend of differences. Yet, what truly makes India extraordinary is not its diversity—it is the unity that binds this diversity together.

We pray in different places of worship, speak different mother tongues, wear different clothes, and celebrate different festivals. But when the National Anthem is played or the tricolour rises into the sky, every Indian stands with the same pride. Our differences do not divide us; they make us stronger.

History has repeatedly shown that whenever India stood united, it achieved the impossible. During the freedom struggle, people from every religion, region, language, and community joined hands with one dream—a free India. That spirit of togetherness became the foundation of our nation.Today, however, unity is tested by prejudice, misinformation, and hatred spread through rumours and social media. It is easy to create differences, but it takes wisdom and courage to build harmony. As students, we must learn to respect opinions, appreciate cultures, and reject discrimination in every form. True patriotism is not merely loving our country—it is respecting every person who calls India home.

Our strength does not lie in speaking the same language or following the same traditions. It lies in accepting one another despite our differences. Diversity gives India its colours, but unity gives it its soul.

India's greatest strength is not that we are all alike. It is built when people with different identities stand together with one heart, one hope, and one future. That is the true meaning of "Unity in Diversity."

**Kavyanjali Jay Kad**
**Grade X**
**Priyadarshani School**
**Moshi.**